## नमस्काराष्टक

अनंता तुला तें कसें रे स्तवावें ।
अनंता तुला तें कसें रे नमावें ।।
अनंत मुखांचा शिणे शेष गातां ।
नमस्कार साष्टांग श्रीसाइनाथा ।। १ ।।

स्मरावें मनीं त्वत्पदां नित्य भावें ।
उरावें तरी भक्तिसाठी स्वभावें ।।
तरावें जगा तारूनी मायताता । नमस्कार० ।। २ ।।

वसे जो सदा दावया संतलीला ।
दिसे अज्ञ लोकांपरी जो जनांला ।।
परी अंतरी ज्ञान कैवल्यदाता । नमस्कार० ।। ३ ।।

बरा लाधला जन्म हा मानवाचा ।
नरा सार्थका साधनीभूत साचा ।।
धरूं साइप्रेमा गळाया अहंता । नमस्कार० ।। ४ ।।

धरावें करीं सान अल्पज्ञ बाला ।
करावें आम्हां धन्य चुंबोनि गाला ।।
मुखीं घाल प्रेमें खरा ग्रास आतां । नमस्कार० ।। ५ ।।

सुरादिक ज्यांच्या पदा वंदिताती ।
शुकादिक ज्यांतें समानत्व देती ।।
प्रयागादि तीर्थेपदीं नम्र होतां । नमस्कार० ।। ६ ।।

तुझ्या ज्या पदा पाहतां गोपबाली ।
सदा रंगली चित्स्वरूपी मिळाली ।।
करी रासक्रिडा सवें । कृष्णनाथा । नमस्कार ० ।। ७ ।।

तुला मागतों मागणें एक द्यावें ।
करा जोडितों दीन अत्यंत भावें ।।
भवी मोहनीराज हा तारिं आतां । नमस्कार ० ।।८ ।।